**सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय. ०९-०००० ९४-२०१७**

**नियमित दिवाणी दावा क्र.३४/२०१७**

**निशाणी क्र. ७१ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ नियम ४ सह आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिवादी क्र.२ यांचे वारस रेकॉर्ड घेवून तशी दुरुस्ती करणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीने आपल्या अर्जात असे कथन केले आहे की, सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द वाटपासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी क्र.२ विठोबा बापू सारंग हे दि.०९/०२/२०२४ रोजी मयत झाले आहेत. तरी मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस याकामी सामील करणेत यावे अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादी क्र.३ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार वादीने कोणतेही संयुक्तीक कारण दिले नाही. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

४. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की,या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र.३ तर्फे नि.क्र.६८ येथे पुरशीस दाखल करुन प्रतिवादी क्र.२ हे मयत आहेत असे कथन केले आहे. प्रस्तुतचा अर्ज वादीने उशिराने दाखल केलेला आहे. वादीचे विलंबाबाबतचे नमुद कारण स्विकारार्ह नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. मात्र न्यायालयास परिणामकारक व परिपुर्ण निवाडा करताना व वादी, प्रतिवादी यांच्यामध्ये असलेले वादाचे संपुर्ण निराकरण एकाच दाव्यामध्ये होणेसाठी न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून प्रस्तुत अर्ज मंजूर करुन मयत प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आदेश –**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीस प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब वादीने प्रतिवादींना रक्कम रुपये ३००/– देण्याच्या अटीवर माफ करणेत येत आहे.

३. वादीने प्रतिवादी क्र.२ यांचे वारस अभिलेखावर घेवून तशी त्वरीत दुरुस्ती करावी.

NANDA BAPUSO GHATAGE
Digitally signed by NANDA BAPUSO GHATAGE
Date: 2024.09.27 15:28:43 +0530

( श्रीमती एन.बी.घाटगे )

दिनांकः २५/०९/२०२४

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर देवगड.